xxxxx प्रकरण चौथे xxxxx

xxxxx पं. भीष्माचार्यांच्या पंचवार्तिकाचा परिचय आणि स्वरूप xxxxx

प्रकरण चौथे

पं·भीष्माचार्यांच्या पंचवार्तिकाचा परिचय आणि स्वरूप·

तेराव्या शतकापर्यंत मराठी भाषेत लिहिल्या गेलेल्या साहित्यावर संस्कृत भाषेचा व साहित्याचा प्रभाव असल्याने संस्कृत परंपरेप्रमाणेच ते लिहिले जात होते· नंतर मात्र ही परिस्थिती बदलू लागली· तेराव्या शतकात मराठीसारख्या लोकभाषेतून जे साहित्य अवतीर्ण झाले, त्याने संस्कृत परंपरेपासून आपले वेगळेपण सिध्द करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो· चरित्र, काव्य, गद्य, छंदशास्त्र, भाषाशास्त्र, साहित्यशास्त्र, व्याकरणशास्त्र अशा विविध प्रकारांतून साहित्याची अनेक रूपे प्रकट होत गेली· संस्कृत साहित्यपरंपरेपेक्षा या शतकातील मराठीतील साहित्य भिन्नस्वरूपी लिहिले गेले· संस्कृत साहित्यापेक्षा वेगळ्या प्रेरणा, वेगळी भूमिका व वेगळी पध्दती मराठी भाषिक लेखकांनी स्वीकारली· लोकभाषेची विविध वळणे त्या काळातील लेखनात अवतीर्ण झाली· या काळात महानुभावीय साहित्याने मराठी वाङ्मयात मोठी भर घातलेली दिसून येते· "पंचवार्तिक"कार पं·भीष्माचार्य व त्यांचे ग्रंथलेखन याच काळातील मानले जाते·

तेराव्या शतकात मराठी भाषेत जे विविध प्रकारचे साहित्य लिहिले गेले, त्यात व्याकरणशास्त्राचाही समावेश आहे· कोणत्याही भाषेचे व्याकरण हे त्या भाषेच्या उत्पत्तिबरोबरच जन्मलेले असते· पण लिखित स्वरूपात अस्तित्वात यायला त्याला वेळ लागतो· भाषेला प्रौढत्व आले, तिला स्थैर्य प्राप्त होऊ लागले की, भाषेला व्याकरणाची गरज भासू लागते· मराठी भाषेची उत्पत्ती ही इ·स·च्या सातव्या शतकातील मानली जाते आणि तिचे व्याकरणलेखन मात्र तेराव्या शतकात झाले· किंबहुना त्यापूर्वीही ते लिहिले गेले असावे कारण तेराव्या शतकापूर्वीही मराठी भाषा परिपक्व अवस्थेत असल्याचे दिसून येते· कदाचित काळाच्या ओघात ते नाहीसे झाले असावे·

एकाच भाषेत अनेक बोलीभाषा असतात· भाषेच्या प्राथमिक अवस्थेत त्या भाषेतील सर्वच बोलींना सारखे महत्त्व असते· हळूहळू या बोलींपैकी एखादी बोलीभाषा

सर्वांना आकलन होईल अशा स्वरूपाची होते· भाषिक व्यवहार समपातळीवर होण्यासाठी सर्वच बोलीभाषेतील लोक अशा एखाद्या सहज आकलनक्षम व स्थीर होऊ पाहणा-या बोलीभाषेला प्रमाण मानतात आणि ती प्रमाणभाषा बनते· तेथून पुढच्या काळात या प्रमाणभाषेशी जवळीक साधणारे बोलणे वा लिहिणे सुसंगत व शुध्द मानले जाते· हे ठरविण्यासाठीच भाषेला काही नियमांची गरज निर्माण होते· असे तयार होणारे नियम म्हणजेच त्या भाषेचे व्याकरण होय· या प्रमाणित भाषेतील बोलीभाषांना नियंत्रित करून मुख्य भाषेच्या प्रवाहात आणण्याचे व त्यांना एकत्रित करण्याचे काम व्याकरणातील नियमांना करावयाचे असते· भाषेचे आदर्श स्वरूप ठरवून त्या भाषेतील लोकांना शुध्द कसे बोलावे व लिहावे याबाबतचे मार्गदर्शन करण्याचे प्रमुख कार्य व्याकरणाला करावे लागते·

मराठी भाषेचे शास्त्रीय स्वरूपाचे सविस्तर व्याकरण इंग्रजी काळात लिहिले गेले असले तरी एवढे परिपक्व स्वरूपाचे व्याकरण एकाएकी लिहिले गेलेले नाही· मराठी भाषेच्या व्याकरणाची परंपरा तशी फार जुनी आहे· ज्ञानेश्वरांच्या काळात मराठीत ज्या रचना लिहिल्या गेल्या त्यांची परिपक्वता पाहिल्यावर तर असे वाटते की, ज्ञानेश्वरांच्या पूर्वीही मराठी व्याकरण लिहिण्याचे प्रयत्न झाले असले पाहिजेत· मात्र ते प्रयत्न अज्ञात असल्याने, तेराव्या शतकातील महानुभावीय ग्रंथकारांचेच व्याकरण लेखनाचे प्रयत्न आद्य प्रयत्न मानावे लागतात· महानुभाव संप्रदायात कवीश्वर व्यास, आनेराज बास, पं·भीष्माचार्य व पं·विश्वनाथ वर्धनस्थ बीडकर या चार साहित्यिकांनी वेगवेगळ्या काळात मराठी भाषेचे व्याकरण लिहिण्याचे प्रयत्न केले· यांच्यापैकी कवीश्वर व्यासांचा व्याकरणग्रंथ अनुपलब्ध असल्याने त्यांच्या व्याकरणलेखनाविषयी अधिक माहिती मिळू शकत नाही· सोळाव्या शतकात होऊन गेलेल्या पं·विश्वनाथांनी छंदशास्त्रावर लेखन केलेले आहे· आनेराज बासांनी "लक्षण-रत्नाकर" लिहिले, तर पं·भीष्माचार्यांनी "नामविभक्ती" व "पंचवार्तिक" हे दोन मराठी भाषेचे व्याकरणग्रंथ मराठी भाषेत लिहिले·

काशीहून महाराष्ट्रात येऊन स्थायिक झालेल्या कुटुंबातील पं·भीष्माचार्य रामदेवराय यादवांच्या दरबारातील एक विव्दान व पंडित म्हणून गणले जात होते· त्यांनी महानुभाव पंथ स्वीकारल्यानंतर पंथनिष्ठेच्या प्रेरणेतून एकूण २९ ग्रंथ लिहिले असल्याचा निर्वाळा दिला जातो·[१] या २९ ग्रंथांतीलच "नामविभक्ती" व "पंचवार्तिक" हे दोन व्याकरणग्रंथ आहेत· "नामविभक्ती" हा ग्रंथ भाषाशास्त्रावरील आहे· तर "पंचवार्तिक" हा त्यांचा ग्रंथ व्याकरणशास्त्रावरील स्वतंत्र ग्रंथ होय·

12227
A

पाच वार्तिकांचा समूह ते "पंचवार्तिक" आणि "वार्तिक" म्हणजे सूत्रात जे सांगावयाचे राहिले त्यासाठी वार्तिकरूपाने रचलेल्या काही परिभाषा· सूत्रलक्षण, सूत्रप्रकृतिलक्षण, सूत्रकारकलक्षण, सूत्रव्याख्यानलक्षण व सूत्रस्वरूपलक्षण ही पाच वार्तिके या पंचवार्तिक ग्रंथात समाविष्ट करून त्यावर पं·भीष्माचार्यांनी सविस्तर चर्चा केली आहे· ग्रंथाच्या सुरूवातीलाच दोन श्लोकात लेखकांनी या पाच वार्तिकांचा उल्लेख केला आहे·

सूत्रलक्षणमेवं च सूत्रप्रकृतिलक्षणम् ।
सूत्रकारकमेवं च सूत्रव्याख्यानलक्षणम् ।। १ ।।
सूत्रस्वरूपमेवं च कथितं शास्त्रवेदिभिः ।
पंचवार्तिकमेतद्यः पठेत स पण्डितो भवेत् ।। २ ।।

तेराव्या शतकात महाराष्ट्रात शिक्षित लोक कमी होते· महानुभाव पंथाचा प्रसार अधिकाधिक होण्यासाठी पंथाच्या तत्वज्ञानविषयक ग्रंथातील तत्वज्ञान लोकांना वाचता आले पाहिजे, आकलन झाले पाहिजे व पटले पाहिजे याची जाणीव महानुभावीय ग्रंथकारांना झाली असली पाहिजे· पंथप्रसारासाठी लोकांनी तत्वज्ञान वाचले पाहिजे· वाचन करता येण्यासाठी प्रथम भाषेचे शिक्षण घेतले पाहिजे आणि भाषाशिक्षण घेण्यासाठी तिच्या व्याकरणापासून सुरूवात केली पाहिजे· या आवश्यकतेतून व्याकरण लिहिण्याची प्रेरणा पं·भीष्माचार्यांना मिळाली असावी, आणि त्यांनी "पंचवार्तिक" हा व्याकरणग्रंथ लिहिला असावा·

"पंचवार्तिकां"चे स्वरूप :-

पं·भीष्माचार्यांच्या "पंचवार्तिक" ग्रंथात एकूण पाच प्रकरणे आहेत· सूत्रलक्षण, सूत्रप्रकृतिलक्षण, सूत्रकारकलक्षण, सूत्रव्याख्यानलक्षण व सूत्रस्वरूपलक्षण अशी वार्तिकांची पाच अंगे पाच प्रकरणात लेखकांनी चर्चिली आहेत· "पंचवार्तिक" ग्रंथ तसा केवळ
पानांचाच आहे· या ग्रंथाला श्री·दत्तराज महानुभाव यांची प्रस्तावना लाभली आहे· प्रस्तावनेत त्यांनी पं·भीष्माचार्यांना मराठीचे आद्य व्याकरणकार असे संबोधले आहे· लोकमान्य टिळकांनीही पंचवार्तिकाची दखल घेतली होती असे ते सांगतात· या ग्रंथाचा लेखनकाळ, थोडक्यात स्वरूप व महत्त्वही प्रस्तावनाकारांनी सांगितले आहे· ग्रंथाच्या सुरूवातीलाच वाकम-दिगमाची गोष्ट" सांगून, भाषाज्ञान नसल्यास मनुष्याची अवस्था कशी होते याची प्रचिती आणून दिली आहे·

<u>सूत्रलक्षण</u> :-

"सूत्रलक्षण" या पहिल्या प्रकरणात, सूत्र म्हणजे असा प्रयोग की, ज्यात अल्पाक्षरत्व, असंदिग्धता व सार्थकतायुक्त निर्दोषी अर्थज्ञान असेल. असा सूत्राचा अर्थ स्पष्ट करून {अ} वचन, {ब} वाक्य, {क} प्रकरण व {ड} महावाक्य असा सूत्राचे चार भेद सांगितले आहेत. "तीन पदांचे सूत्र म्हणजे वचन", "सहा वचनांचे सूत्र म्हणजे वाक्य", "बारा वाक्यांचे सूत्र म्हणजे प्रकरण" व "बारा प्रकरणांचे सूत्र म्हणजे महावाक्य" अशा या चार संकल्पनांच्या व्याख्या दिल्या आहेत. ही प्रक्रिया कशी घडून येते, याबाबत भाष्यकार पुढीलप्रमाणे विवेचन करतात - आचार विचार व्यक्त करणारे एक-दोन शब्द एकत्रित येऊन त्याचे वचन होते. अशा दोन-चार वचनांचा समुच्चय म्हणजेच वाक्य होय. पाच-सात प्रकरणांचा एकत्रित संच निर्माण होऊन महावाक्याची निर्मिती होते.

<u>{अ} वचन</u> :- एका वचनात किती पदे आहेत, यावरून पदसंख्येनुसार वचनाचे एकपदी, व्दिपदी व त्रिपदी असे तीन भेद लेखक सांगतात. .१. एका पदाचे वचन. उदा.कृपाळू, निरालंबी., .२. दोनी पदांचे वचन, उदा. आनंद तो,ब्रह्मज्ञानं मोक्ष आणि .३. तीनी पदांचे वचन, उदा. आनंद शब्दे इश्वरू बोलिजे. पदाच्या ओळखीशिवाय वचनाची खरी ओळख व स्वरूप स्पष्ट होणार नाही यासाठी पदे आणि पदभेद यांची ओळख या प्रकरणात करून दिली आहे. वचनाची पदे सलिंग, अलिंग व क्रिया अशी तीन प्रकारची असतात.

१. <u>सलिंग पदे</u> :- जी पदे लिंगयुक्त असतात म्हणजेच ज्या पदांचे लिंगभेदानुसार वर्गीकरण होऊ शकते ती सलिंग पदे होत. सलिंग पदाचे जातिद्योत्तक तीन भेद होतात. {अ} पुल्लिंग. उदा. देव, {ब} स्त्रीलिंग. उदा.देवी आणि {क} नपुसकलिंग, उदा.दैव. सलिंग पदाची वचनेही तीन प्रकारची होतात. तिन्ही लिंगांची प्रत्येकी तीन-तीन वचने होतात. पुल्लिंगी शब्दांचे .१. एकवचन, उदा."देव आला" असे होते. "देव आला" यातून एकत्त्व सूचित होते म्हणून ते एकवचन होय. .२. व्दिवचन. उदा."देव आले" यात एकापेक्षा अनेक देव म्हणून व्दित्त्व सूचित होते, तर .३. बहुवचन. उदा."देव आले" यात "अनेक देव" असे अनेकत्त्व किंवा बहुत्त्व सूचित होते म्हणून ते बहुवचन होय. स्त्रीलिंगी पदाचे .१. एकवचन, उदा.देवी आली, .२. व्दिवचन. उदा.देवी आल्या व .३. बहुवचन उदा."देवी आल्या" असे होते यापमाणेच नपुसकलिंगी पदाचे .१. एकवचन, उदा."दैव उदयास आले", .२. व्दिवचन व .३. बहुवचन,

उदा· "दैवे उदयास आली·" असे होते·

सलिंग पदे नाम व सर्वनाम अशी जातिद्योत्तक व्दिविध प्रकारची असतात· या पदांचे पुन्हा केवल पद व संयुक्त पद असे वर्गीकरण केले जाते· जेव्हा एकाच पदापासून अर्थवाही पद बनते तेव्हा ते केवल पद होय· तर दोन किंवा अधिक पदे एकत्र येऊन एकच अर्थ सूचित करणारे एक पद तयार होते तेव्हा ते संयुक्त पद होय· उदा·"परमेश्वर एक आहे" या उदाहरणातील "एक" हे केवल पद आहे तर "परमेश्वर" हे (परम+ ईश्वर) संयुक्त पद आहे· केवल आणि संयुक्त या दोन्हीही प्रकारच्या पदांच्या साती विभक्ती होतात· केवल पदे कृदन्ती प्रत्ययांनी व तध्दिती प्रत्ययांनी सिध्द होतात· तर संयुक्त पदे समास व संधी यांनी सिध्द होतात·

(अ) केवल पदे :- केवल पदे कृदन्ती व तध्दित प्रत्यय लागून सिध्द होतात· कृदन्ती प्रत्यये - कृदन्ती प्रत्यय लागून केवल पदे कशी होतात हे लेखकांनी पुढीलप्रमाणे सोदाहरण दाखविले आहे· कृदन्ती प्रत्यय धातूपासून होतात·

प्रत्यय	उदाहरणे
अ)	जीवु, हर, प्रपंचु, देव·
अक)	कारक, बाधक, साधक·
अन)	स्थान, पचन, पावन
अना)	प्रार्थना, रचना, वेदना
यी)	अनुयायी, शेषयायी, अर्थी·
उ)	भिक्षु, जिज्ञासु·
ता)	दाता, कर्ता, वक्ता·
ति)	भक्ति, मुक्ति, उक्ति·
त्र)	शास्त्र, पात्र, स्तोत्र·
त)	आप्त, प्राप्त, व्याप्त·
य)	कार्य, पूज्य, त्याज्य·
मान)	यजमान
अणीय)	करणीय·
तव्य)	कर्तव्य, दातव्य·
वर)	ईश्वरू·

तध्दिती प्रत्यये :- तध्दिती प्रत्येये नामापासून तयार होतात. ही केवल पदे कशी तयार होतात हे लेखकांनी पुढीलप्रमाणे उदाहरणांसह दाखविले आहे.

	प्रत्यय	उदाहरणे
भावी नामापासून	ता ै	प्रसन्नता, देवता, एकता.
	त्व ै	देवत्त्व, मनुष्यत्त्व, व्यापकत्त्व.
	य ै	धैर्य, लावण्य, औदार्य.
	ता ै	जनता,
	आलु ै	दयालु, श्रध्दालु, कृपालु.
	मान, बान ै	भक्तिमान, बुध्दिमान, विद्यावान.
	मात्र ै	पुरूषमात्र.
	ई ै	ज्ञानी, अभिमानी.
	धा ै	व्दिधा, अष्टधा.
	तर ै	शुभतर, साधुतर
	तम ै	शुभतम, साधुतम
	वत् ै	अमृतवत्
	क ै	आत्मक, भिक्षुक.
	अ ै	वासुदेव, पांडव, कौरव.
	य ै	दैत्य, आदित्य
	इक् ै	कायिक, वाचिक, मानसिक.

केवल पदाच्या सिध्दतेचा पं. भीष्माचार्यांनी केलेला विचार आजच्या शास्त्रीय मराठी व्याकरणात आलेला आहे. यावरून पं. भीष्माचार्यांच्या व्याकरणविषयक ज्ञानाची प्रचिती येते.

ैआै संयुक्त पदे :- संयुक्त पदे समास आणि संधी होऊन सिध्द होतात. समास व संधी दोन पदांची मिळून होतात.

समास :- समासात दोन पदे असतात. सामासिक शब्दातील पहिल्या पदास पूर्वपद तर दुस-या पदास उत्तरपद म्हणतात. अव्ययीभाव, तत्पुरूष, बहुव्रीही आणि व्दंव्द असे समासाचे चार प्रकार पंचवार्तिकात सांगितले आहेत. आजही शास्त्रीय

मराठी व्याकरणात हेच चार प्रकार सांगितलेले आहेत.[२] या चार प्रकारांच्या लक्षणयुक्त व्याख्याही उदाहरणांसह लेखकांनी सांगितल्या आहेत.

१. **अव्ययीभाव समास** :- ज्या सामासिक शब्दातील पहिल्या पदाचा अर्थ प्रधान किंवा महत्त्वाचा असतो, तो अव्ययीभाव समास होय. उदा. यथाशक्ती, यथोचित.

२. **तत्पुरूष समास** :- ज्या समासातील उत्तरपदाचा अर्थ प्रधान असतो, तो तत्पुरूष समास होय. या समासाचे तीन उपप्रकार सांगितले आहेत.

अ. विभक्ती तत्पुरुष. उदा. सर्वशक्तीयुक्त, जीवप्रपंचाव्यतिरिक्त.

ब. कर्मधारय, उदा. परमेश्वरू, महावाक्य.

क. व्दिगु. उदा. त्रिभुवन, अष्टांग.

३. **बहुव्रीही समास** :- समासातील दोन्ही पदांतून निघणारा तिसराच अन्य अर्थ ज्या समासात महत्त्वाचा किंवा प्रधान असतो, तो बहुव्रीही समास होय. उदा. "अनंत-शक्ती"- परमेश्वर, "पीतांबरी"- हरी.

४. **व्दंव्द समास** :- समासातील दोन्ही पदांचा अर्थ ज्या समासात प्रधान असतो तो व्दंव्द समास होय. उदा. "जीवप्रपंच", "हरिहरब्रह्मा", "सच्चिदानंद".

व्दंव्द समासात पूर्वपदी कोणत्या पदाची योजना करावयाची व उत्तरपदी कोणते पद योजावयाचे याचेही तीन नियम सांगितले आहेत.

क. पूर्वपदी "पूज्यपद" योजावे.

ख. पूर्वपदी "इ"कारान्त व "उ"कारान्त पद योजावे.

ग. पूर्वपदी अल्पस्वर पद योजावे.

या नियमाप्रमाणे वरील उदाहरणांतील "सच्चिदानंद" शब्दात "सत्" हे पूज्यपद पूर्वपदी घेतले आहे. "हरिहरब्रह्मा" या शब्दात "हरि" हे "इ"कारान्त पद पूर्वपदी आहे. तर "जीवप्रपंच" या उदाहरणात "जीव" हे अल्पस्वर पद पूर्वपदी योजिले आहे.

संयुक्त पदांची सिध्दता समासाने या प्रकारे होते. पंचवार्तिकातील समासाबाबतचे हे विवेचन आजच्या मराठी व्याकरणातील समास या प्रकरणाशी सुसंगत असेच आहे.[३] आजही सामासिक शब्दापासून निर्माण होणारी संयुक्त पदे अशाच प्रकारे सिध्द होतात. यावरून "पंचवार्तिक" या व्याकरणग्रंथाचे महत्त्व लक्षात येते.

संधी :- संधी होऊनही संयुक्त पदे सिध्द होतात· स्वरापुढे स्वर येऊन, स्वरापुढे किंवा व्यंजनापुढे व्यंजन येऊन आणि विसर्गापुढे स्वर किंवा व्यंजन येऊन अशी तीन प्रकारे संधी होते· पूर्वपदातील शेवटी आलेल्या स्वरापुढे उत्तरपदातील आरंभीचा स्वर येऊन त्यापासून एक स्वर होऊन पहिल्या प्रकारची संधी होते· उदा·आदि+ अन्ती = आद्यन्ती· या शब्दात इ+अ = य· अशी संधी झाली आहे· या प्रकारे उ+ओ=वो उदा·तालु+ओष्ठ=ताल्वोष्ठ, अ+इ=ए· उदा·परम+ईश्वर = परमेश्वर, अ+उ=ओ, उदा·फल+उपभोग = फलोपभोग अशी स्वर+स्वर = स्वर ही संधी आठ प्रकारांनी होत असल्याचे लेखकांनी दाखविले आहे·

पूर्वपदातील शेवटचा वर्ण व्यंजन व उत्तरपदातील आरंभीचा वर्ण स्वर किंवा व्यंजन येऊन त्यांचे एक व्यंजन होऊन संधी होते· हा दुसरा प्रकार होय· उदा·चित्+आनंद = चिदानंद, यत्+दृश्यते = यद्दृश्यते· पूर्वपदातील शेवटचा वर्ण विसर्ग व उत्तरपदातील आरंभीचा वर्ण स्वर किंवा व्यंजन यांचे संयुक्त पद होऊन ही तिस-या प्रकारची संधी होते· यात पूर्वपदातील विसर्ग जाऊन कधी अर्धा "र", अर्धा "स" त्या जागी येतो तर कधी विसर्गाचा "ओ" होऊन संधी होते· उदा· प्रकृतिः+अहम्= प्रकृतिरहम, जिज्ञासूः+उत्तम = जिज्ञासुरूत्तम, तमः+निमग्न = तमोनिमग्न, रजः+तम=रजस्तम

संयुक्तपदाच्या अशा तीन प्रकारच्या संधी होत असल्याचे गंथकर्त्यांनी दाखविले आहे· पण स्वरसंधी, व्यंजनसंधी व विसर्गसंधी अशी नावे मात्र त्यांनी दिलेली नाहीत· शिवाय विसर्गसंधीत काही वेळेला विसर्ग तसाच राहूनही {उदा·दुः+शासन = दुःशासन} संधी होते, याचा उल्लेख केलेला नाही· या दृष्टीने हे संधी विवेचन काहीसे अपुरे वाटत असले तरी व्याकरणकारांचा हा प्रयत्न सहाशे वर्षापूर्वीचा आहे, हेही विसरून चालणार नाही·

सिध्द होणारी केवलपदे व संयुक्तपदे ही नामे किंवा सर्वनामे असतात· ही सिध्दनामे काही विशेषणे असतात तर काही विशेष्ये असतात· सर्वनामे मात्र केवळ विशेषणेच असतात·

१. **अलिंग पदे** :- वचन या सूत्राचा दुसरा प्रकार अलिंग पदे हा होय· "जी पदे लिंगरहित असतात ती अलिंगपदे होत·" अलिंग पदे ही अव्यये असतात· अ व्यय म्हणजे विकार किंवा बदल न होणारे· उदा· की, गा, आन, जरि, तरि,

परि, मग, कें, का इ·अव्यये आहेत· या अलिंग पदांना विकार होत नाही असे विवेचन अलिंग पदांबद्दल लेखकांनी केले आहे·

३. <u>क्रियापदे</u> :- वचनाचा तिसरा प्रकार "क्रिया" सांगितला आहे· क्रिया असणारी पदे ती क्रियापदे· क्रिया सलिंग आणि अलिंग अशा दोन प्रकारच्या असून ज्या क्रियेची रूपे लिंगभेदानुसार बदलतात त्या सलिंग क्रिया होत· उदा·गेला, गेली, गेले इ·तसेच ज्या क्रियेची रूपे लिंगभेद करूनही बदलत नाहीत त्या अलिंग क्रिया होत· उदा·आति, नाही, होए, न होए इ·सलिंगा व अलिंगा अशा दोन्ही प्रकारच्या क्रियेचे वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ असे तीन काळ होतात· याशिवाय प्रेरणा, आशंसा, प्रार्थना व आशीर्वाद या अर्थानुसारही क्रियेची रूपे होतात· एकवचन, व्दिवचन व बहुवचन अशी क्रियेची तीन वचने होतात· तसेच प्रथम पुरूष, मध्यम पुरूष व उत्तम पुरूष हे तीन पुरूषही क्रियेचे असल्याचे पंचवार्तिकात सांगितले आहे· उदा·"तो जातो" येथे प्रथम पुरूष "तु जात असि" येथे मध्यम पुरूष, तर "मी जातो" येथे उत्तम पुरूष आहे· सध्याच्या मराठी व्याकरणात मानले जाणारे पुरूष आणि पंचवार्तिकात सांगितलेले पुरूष यांच्यात फरक दिसून येतो· पंचवार्तिकात सांगितलेला उत्तम पुरूष प्रचलित व्याकरणात प्रथम पुरूष मानला जातो, मध्यम पुरूष तो आजचा व्दितीय पुरूष तर पंचवार्तिकातील प्रथम पुरूषी वाक्याला सध्याच्या व्याकरणात तृतीय पुरूषी मानतात·[४]

क्रियेचे सकर्मक व अकर्मक असेही दोन भेद सांगितले आहेत· ज्या क्रियेचा फल आणि व्यापार वेगवेगळया ठिकाणी होतो अगर होऊ शकतो ती सकर्मक क्रिया होय· उदा·परमेश्वर जीवाते उध्दरिती·" याउलट ज्या क्रियेचा फल आणि व्यापार एकाच ठिकाणी होतो ती अकर्मक क्रिया होय· उदा·"देव आले"· तसेच क्रियेचे क्वचित कर्तरि, क्वचित कर्मणि व क्वचित भावे हे तीन प्रयोग लेखकांनी सांगितले आहेत· ज्या प्रयोगात क्रिया कर्त्यानुसार असते म्हणजे कर्त्यानुसार बदलते तेव्हा तो क्वचित कर्तरि प्रयोग असतो· उदा·"परमेश्वर जीवाते उध्दरिती"· क्रिया कर्मानुसार असेल तर तो क्वचित कर्मणि प्रयोग असतो· उदा·"पुरूषे धर्माधिरू दीजे"· आणि ज्या प्रयोगात क्रिया केवळ क्रिया द्योतनार्थ असते तो भावे प्रयोग असतो· उदा·"जीतेनि मृताचा धर्मी वर्तावे"· प्रचलित मराठी व्याकरणात स्थित असलेल्या चार प्रयोगांपैकी तीन प्रयोग[५] पूर्वीच पं·भीष्माचार्यांनी सांगितलेले आहेत· या प्रयोगांच्या नावात सुरूवातीला "क्वचित" हा शब्द त्यांनी योजिलेला आहे·

§ब§ वाक्यविचार :- "सहा वचनांचे सूत्र म्हणजे वाक्य होय" अशी वाक्याची व्याख्या सांगून "वाक्यातील पदांच्या संख्येवरुन" वाक्यांचे १५ भेद पंचवार्तिकात सांगितलेले आहेत·

१. चौ पदांचे वाक्य· उदा·"कृतयुगी आत्मोपास्ति हा धर्मु ।"

२. पांचा पदांचे वाक्य· उदा·"मग एकु अनुसरीत एकु नानुसरीत·"

३. सा पदांचे वाक्य· उदा·"जड अजड चिज्जड एवं विविध माया·"

४. साता पदांचे वाक्य·····याप्रमाणे क्रमाने "पंधरा पदांचे वाक्य" इथपर्यंत १५ प्रकार सांगून या सर्व प्रकारांची उदाहरणेही ग्रंथात दिली आहेत·

वाक्ये काही केवळ व काही संयुक्त अशी दोन प्रकारची असतात· जेव्हा वाक्यातील सर्व पदांना व्यापणारे एकच क्रियापद वाक्यात असते तेव्हा ते "केवल वाक्य" असते· उदा·"जीव प्रपंच व्यतिरिक्त सच्चिदानंद स्वरूप परमेश्वरू एकु आति" या वाक्यात "आति" हे एकच क्रियापद वाक्यातील सर्व पदांना व्यापणारे आहे· ज्या वाक्यात दोन किंवा त्यापेक्षा अधिक क्रियापदे येऊन ती आपापल्या पदांना व्यापतात, असे वाक्य "संयुक्त वाक्य" होय· उदा·"तुष्टला जन तरि विखो संपादैल, रूसला तरी प्राणां घतैल, भणौनि उभयतां जनसंबंधु त्याज्य·" या वाक्यात "संपादैल", "घतैल" व "त्याज्य" ही तीन क्रियापदे आलेली असून ती त्या त्या केवल वाक्यातील पदांना व्यापीत आहेत·

एक संयुक्त वाक्य दोन प्रयोगाचे मिळून बनते की तीन प्रयोगांचे मिळून होते यावरुन वाक्याचे तीन प्रकार पडतात·

१. वचनवत्प्रयोगी संयुक्त वाक्य,

२. वाक्यवत्प्रयोगी संयुक्त वाक्य, व

३. वचनवाक्यवत्प्रयोगी संयुक्त वाक्य·

वचनवत्प्रयोगी संयुक्त वाक्य दोन प्रयोगांनी बनलेले असते· हे दोन्ही प्रयोग प्रत्येकी तीन-तीन पदांचे असतात· उदा·"चैतन्य देवता होए परि परमेश्वरू नव्हे" या उदाहरणात "चैतन्य देवता होए" व "परि परमेश्वरू नव्हे" हे दोन्ही प्रयोग तीन-तीन पदांचे आहेत·

वाक्यवत्प्रयोगी संयुक्त वाक्य हे दुस-या प्रकारचे वाक्यही दोन केवल वाक्यांचे असते· यातील पहिला प्रयोग षटपदी व दुसरा पंचपदी असतो· उदा· "हा गा देव

कांई अनेक असति, देव तो एक चि की" या उदाहरणातील पहिला प्रयोग षट्पदी तर दुसरा पंचपदी आहे·

वचनवाक्यवत्प्रयोगी संयुक्त वाक्य या तिस-या प्रकारातील संयुक्त वाक्येदेखील दोन प्रयोगांचीच असतात· यातील पहिला प्रयोग त्रिपदी व दुसरा चतुष्पदी असतो· काही वेळेला यातील दोन्ही प्रयोग अनुक्रमे त्रिपदी व पंचपदीही असतात· उदा·"एथ श्रीकृष्णी त्रिविधजन श्री प्रभूंच्या ठाई व्दिविधजन" या वाक्यातील पहिला प्रयोग त्रिपदी आहे तर दुसरा प्रयोग चतुष्पदी आहे· वरील तिन्ही प्रकारच्या संयुक्त वाक्यात दोन-दोनच केवल वाक्ये असतात· मात्र त्या त्या केवल वाक्यातील पदांची संख्या वेगवेगळी असल्यानेच संयुक्त वाक्याचे हे तीन प्रकार पडतात·

संयुक्त वाक्यातील एखाद्या प्रयोगात जेव्हा एखाद्या पदाची न्यूनता असते तेव्हा त्याच वाक्याच्या पूर्वसूत्रातील पदाची पुनरावृत्ती करून वाक्यात पूर्णता आणावी· याचे अधिक स्पष्टीकरण लेखक पुढील उदाहरणाने करतात· उदा·"तुष्टला जन तरि संपादैल, रूसला तरि प्राणां घतैल, भणौनि उभयंता जन संबंधु त्याज्य·" या सूत्रातील "रूसला तरि प्राणां घतैल" या दुस-या प्रयोगात "जन" या पदाची न्यूनता आहे· पण याच सूत्रातील पहिल्या प्रयोगात "जन" हे पद आलेले आहे· त्याची "भीतरीचि आ भीतरी" म्हणजे अध्याहृतपणे अनुवृत्ती करावी· जसे "तुष्टला जन तरि विखो संपादैल" येथे "कोणासी संपादैल ?" असा प्रश्न निर्माण होतो व "अनुसरलेल्या पुरूषाशी" हे उत्तर आहे· पण "अनुसरलेल्या पुरूषाशी" हे पद या ठिकाणी अध्याहृत आहे, तरी हे समजून घ्यावे लागते· या प्रकारे चतुर्विध सूत्रात पूर्व प्रयोगातील पदानुवृत्ती करून प्रयोगातील न्यूनता काढून टाकावी·

"पंचवार्तिक"कारांनी केलेले हे वाक्यविवेचन व वाक्याचे केवल वाक्य व संयुक्त वाक्य असे प्रयोगानुसार केलेले भेद पाहता सध्याच्या शास्त्रीय मराठी व्याकरणातील वाक्यविचारही याच अनुषंगाने केला असल्याचे दिसते· सध्याच्या वाक्यविचारातील "मिश्र वाक्य" हा तिसरा भेद मात्र भीष्माचार्यांनी सांगितलेला नाही· "संयुक्त वाक्य" या प्रकारातच त्यांनी मिश्र वाक्याचाही अंतर्भाव केलेला आहे·

(क) प्रकरणविचार :- प्रकरण हा सूत्राचा तिसरा प्रकार पं·भीष्माचार्यांनी सांगितला आहे· "बारा वाक्यांचे सूत्र ते प्रकरण" अशी प्रकरणाची व्याख्या सांगून त्याचे एकूण दहा भेद सांगितले आहेत·

१. तीनि वाक्यांचे प्रकरण· उदा· "पोरे आ एका कारणे सातां पाचांचा सासुरवासु पाहिजे, मा विश्वाचा पति परमेश्वरू तेनेसि धरणे मांडिले, असे तरि जगाचा सासुरवासु पाहिजे की·"

२. चौ वाक्यांचे प्रकरण··· असे अनुक्रमे "बारा वाक्यांच्या प्रकरणापर्यंत" दहा प्रकार सांगून त्यांची उदाहरणे पंचवार्तिक ग्रंथात दिली आहेत·

चौ पदांचे वाक्य ते अठरा पदांचे वाक्य असे वाक्यांचे १५ प्रकार होतात· एका पदाचे, दोन पदाचे व तीन पदाचे वचन असे वचनाचे तीन प्रकार सांगितलेले आहेत· यांतील "एका पदाचे वचन" हा पहिला प्रकार वगळून वचनाचे दुसरे दोन्ही प्रकार प्रकरणसूत्रात वाक्य म्हणून मानावे असे भीष्माचार्य सांगतात· हे वचनाचे दोन प्रकार जमेस धरून वाक्यांचे एकूण १७ प्रकार होतात· या १७ प्रकारांमधून कोणत्याही "बारा वाक्यांचा मेळावा" जेथे होईल, ते प्रकरणसूत्र होय· असे प्रकरणसूत्राचे स्पष्टीकरण पं·भीष्माचार्यांनी दिले आहे·

<u>ड महावाक्य</u> :- सूत्राचा चौथा प्रकार म्हणजे "महावाक्य" होय· "बारा प्रकरणांचे सूत्र ते महावाक्य" अशी महावाक्याची व्याख्या करून लेखकांनी दोन प्रकारे त्याचे वर्गीकरण केले आहे· "साता पाचां प्रकरणांचा बांधा ते महावाक्य" असा अर्थ पहिल्या प्रकारात सांगितला आहे· पहिल्या वर्गीकरणानुसार १. तीन प्रकरणांचे महावाक्य, २. चार प्रकरणाचं महावाक्य·····असे "बारा प्रकरणांच्या" महावाक्यापर्यंत दहा भेद सांगून प्रत्येकाची उदाहरणे ग्रंथात दिली आहेत·

"सात पाच नामग्रहणे जिये वाक्यी असति ते महावाक्य बोलिजे" असा दुस-या प्रकारे महावाक्याचा अर्थ सांगितला आहे· पाच-सात प्रकरणांच्या समुच्चयाचे जसे महावाक्य होते तसे एका वाक्यात पाच-सात नामे त्यांच्यात एकसूत्रता असणारी आली तरीही ते वाक्य "महावाक्य" म्हणावे· उदा· "जीव प्रपंच व्यतिरिक्त सच्चिदानंद स्वरूप परमेश्वर एकु आति" या वाक्यात जीव, प्रपंच, सत्, चित्त, आनंद, परमेश्वर ही एकसूत्री नामे आली आहेत· याही प्रकारे १.तीन नामांचे महावाक्य, २. चार नामांचे महावाक्य·····असे क्रमाने "बारा नामांचे महावाक्य" इथपर्यंत दहा भेद सांगून त्यांचे सोदाहरण स्पष्टीकरण लेखकांनी केले आहे·

पेंडीलक्षण :- सूत्रलक्षणाचे विवेचन करताना प्रसंगपरत्वे "पेंडीलक्षण" ही संकल्पना ग्रंथकर्त्यांनी स्पष्ट केली आहे. "अवघे आ शास्त्राचा आवाका याते पेंडी बोलिजे" अशी पेंडीची व्याख्या त्यांनी दिली आहे. शास्त्रात जे सांगितलेले असते त्याचा सारांश म्हणजे अवाका होय. अशा सर्व शास्त्राच्या अवाक्याचे जे सार एकत्रितरित्या सांगितले जाते त्याला पेंडी म्हणावे.

सूत्रप्रकृतिलक्षण :-

पंचवार्तिकाच्या दुस-या प्रकरणात पं. भीष्माचार्यांनी "सूत्रप्रकृतिलक्षण" सांगितले आहे. सूत्रांची रूपे पाहता दोन सूत्रांच्या रूपात रचनासाम्य दिसते. परंतु वरकरणी असे साम्य दिसत असले तरी परस्परांत काही विविधता असते. ही विविधता म्हणजेच सूत्रांची प्रकृती होय. उदा. "परा पश्यन्ती मध्यमा वैखरी " आणि "चहुयुगी परमेश्वरू जीवांते उध्दरिती" या दोन सूत्रात प्रत्येकी चार-चार पदे आहेत. या दोन्ही सूत्रात पदसंख्येनुसार रचनासाम्य दिसत असले तरी पहिले सूत्र वाचा नामभेदाचे ज्ञापक आहे तर दुसरे परमेश्वर व्यापाराचे ज्ञापक आहे. अशा स्वरूपदृष्टया विविधतेमुळे "सूत्रप्रकृतिचे" ज्ञान असणे आवश्यक आहे.

सूत्रप्रकृतीची अशी आवश्यकता प्रतिपादन करून सूत्रप्रकृतिनुसार सूत्राचे दहा प्रकार लेखकांनी सांगितले आहेत. संज्ञा, परिभाषा, विधी, नियम, अतिदेश, अपवाद, विभाषा, निपात, प्रतिबंध, अधिकार अशा दहा प्रकारांतून सूत्रप्रकृतीच्या विविधतेची ओळख होते. पुढील श्लोकातून हे दहा प्रकार वैय्याकरणांनी सांगितले आहेत.

"संज्ञा च परिभाषा व विधिर्नियम एव च
अतिदेशो पवादश्च विभाषा व निपातनाम्
प्रतिषेधो धिकारश्च सूत्रं तदृशधा विदुः"

या दहा प्रकारांची लक्षणे सांगून त्यांचे सोदाहरण स्पष्टीकरण लेखकांनी केले आहे.

१. **संज्ञा सूत्रांचे लक्षण** :- सजातीय, विजातीय किंवा दोन्हीही मिश्र स्वरूपात वस्तूनामे एकत्र येऊन संज्ञासूत्र (उद्देशसूत्र) तयार होते. उदा. "परा पश्यन्ती मध्यमा वैखरी " हे सजातीय वस्तूनामांचे सूत्र आहे तर "लौकिक, भौतिक, उपसंहाराख्य लाभाख्य" हे विजातीय वस्तूनामांचे सूत्र आहे.

२. **परिभाषा सूत्रांचे लक्षण** :- शास्त्रांची जशी परिभाषा तशी सूत्रांचीही असते· परिभाषा शब्दांच्या अर्थाशी संबंधित असते· "शब्दांच्या अर्थाचे ज्ञापकसूत्र ते परिभाषासूत्र होय·" "भणिजे", "बोलिजे", "भणिजेति", "बोलिजेति" अशी क्रियापदे म्हणजेच परिभाषा, आणि असे शब्दाच्या अर्थाचे ज्ञापक असणारे शब्द ज्या सूत्रात असतात ते परिभाषासूत्र होय· उदा· "सच्छब्दे ब्रह्म बोलिजे", "चिच्छब्दे माया बोलिजे" ही सूत्रे क्रियापदयुक्त आहेत· तसेच "लक्षणसूत्रेही" शब्दार्थाचे ज्ञापक होतात, म्हणून त्यांनाही परिभाषा शब्द म्हणतात· उदा·"नित्य श्रध्दा देवता", "बध्दमुक्त जीव"· याशिवाय जी संख्याज्ञापक सूत्रे शब्दार्थाचे ज्ञापक होतात, त्यांनाही परिभाषा शब्द म्हणतात· उदा·"बत्तीस लक्ष कृतयुग", "कृतयुगी लक्षभर आयुष्य" या वाक्यांत "बत्तीस" व "लक्षभर" हे शब्द संख्याज्ञापक सूत्रे या तीनच्या साहयांनी होणारी सूत्रे परिभाषासूत्र होत·

३. **विधिसूत्रांचे लक्षण** :- विधिरूप किंवा निषेधरूप अशा शब्दांतून जेव्हा एखादा आचार व्यक्त होतो तेव्हा ते आचारसूत्र विधिसूत्र म्हणावे· विधिसूत्रांचे दोन प्रकार सांगितले आहेत·

> विधिरूप :- म्हणजे होकारात्मक· उदा·"कीजे", "करावा", "होआवा" अशा होकारात्मक क्रियापदांनी युक्त सूत्र ते विधिरूप विधिसूत्र होय·
>
> **निषेधरूप** :- म्हणजे नकारात्मक· उदा·"न कीजे", "न करावा", "न होआवा", "त्यजावे", "सांडावे" अशा निषेधार्थी ज्ञापक क्रियापदांनी युक्त ते निषेधरूप विधिसूत्र म्हणावे·

तसेच कर्तव्याची ज्ञापके क्रियापदे ज्या सूत्रात येतात, तेही विधिसूत्र होय· उदा·"नामस्मरण कीजे", "प्राप्तार्थाचा त्यागु करावा·" विधिरूप क्रियापदेयुक्त, निषेधरूप क्रियापदेयुक्त व कर्तव्याची ज्ञापके असणारी क्रियापदेयुक्त अशा तीनपैकी एखाद्या लक्षणाने युक्त असणारे सूत्र म्हणजे विधिसूत्र होय·

४. **नियम सूत्रांचे लक्षण** :-· ज्या विचारसूत्रात "करी", "करवी", "करिति", "बोले", "देति", "घे", "ने", "असे", "अवतरे", "उजळे" इ· क्रियापदे येतात आणि वस्तुनियम, वस्तुस्वरूपनियम, वस्तुकारणानियम व वस्तुकार्यनियम असे नियम या सूत्रातून व्यक्त होतात, त्यांना नियमसूत्र म्हणावे· उदा·—

वस्तुनियम - "अपमृत्यू एकु आति."

वस्तुरुपनियम - "स्त्रियाचा स्वरूपी आग्रहो एकु आति"

वस्तुकारणनियम - "अनंतशक्ति परमेश्वर सकळांसि ही विषयव्यवस्था करीति."

वस्तुकार्यनियम - "अयोग्यासि योग्य करीति योग्यासि परमेश्वर ज्ञानु देति."

५. **अतिदेश सूत्रांचे लक्षण** :- ज्या सूत्रात प्रामुख्याने दृष्टांत सांगितलेला असतो ते अतिदेशसूत्र होय. उदा."त्यागु जैसा खेई योईचा", "वैराग्य जैसा भर्तृहरीचा" या दोन्ही उदाहरणात "खेईयोई" व "भर्तृहरी" यांचा दृष्टांत दिला आहे. अशी जेवढी "चाकारान्त" दृष्टांतसूत्रे असतात ती सर्व अतिदेशसूत्र समजावीत.

६. **अपवाद सूत्रांचे लक्षण** :- एकाची निंदा आणि एकाची प्रशंसा असे दोन्ही प्रकार ज्या एकाच सूत्रात असतात ते अपवाद सूत्र होय. उदा. "उलेआ पसि कोरज चांगु", "ज्ञाना पसि प्रेम उत्तम" या उदाहरणांत एकापेक्षा दुसरे श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. म्हणजेच एकाची उन्नती व एकाची अवनती एकाच सूत्रात केलेली आहे.

७. **विभाषा सूत्रांचे लक्षण** :- ज्या सूत्राच्या शेवटी संबोधन, व्दितिया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी या विभक्ती किंवा अव्यये येतात ते विभाषा सूत्र म्हणावे. उदा."एके रोमेचा ठाई सहस्त्र विंचवाची वेदना त दुःख देहांती जीवासी", "जेचि मान ब्रह्मांडी, तेचि पिंडी" या दोन्ही सूत्रांच्या शेवटी अनुक्रमे व्दितिया व सप्तमी विभक्ती आल्या आहेत. "इश्वरापासौनि विद्या होए कां विद्यावंतापासौनि" या सूत्राच्या शेवटी अव्यय आले आहे. यानुसार सर्व विभक्ती व अव्यये येणारी उदाहरणे लेखकांनी ग्रंथात दिली आहेत.

८. **निपात सूत्रांचे लक्षण** :- ज्या सूत्रात पदाचे किंवा वाक्याचे निपतन झालेले असते, लोप झालेला असतो ते निपात सूत्र होय. निपाद सूत्र म्हणजे पदावाचून सूत्र. कर्तृपद असून ते क्रियापदाच्या अभावी किंवा दृष्टांत असून द्राष्टींतिकाच्या अभावी असे हे सूत्र असते. उदा."कृतयुगी आत्मोपास्ति हा धर्म" या सूत्रात "धर्म" हे कर्तृपद आहे पण "असे" या क्रियापदाचा अभाव आहे. तसेच "तळिचील हानितले आ वरचील पडे उतरूंडी गडबडी" या सूत्रात दृष्टांत सांगितला आहे पण द्राष्टींतिकाचा अभाव आहे. "अगोदर उदाहरणांदाखल दृष्टांत सांगून नंतर त्या विषयी जो सिध्दांत सांगितला जातो त्याला द्राष्टींतिक म्हणतात."[६] वरील दोन्ही सूत्रात अनुक्रमे क्रियापदाचे व द्राष्टींतिकाचे निपतन झालेले असल्याने ही निपात सूत्रे आहेत.

९. **प्रतिषेध सूत्रांचे लक्षण** :- आचारसूत्र व्यतिरिक्त "नाही", "नव्हे", "ने विजे" "न पविजे", "न मिळे", "न होति" इ. निषेधज्ञापक क्रियापदे ज्या सूत्रात येतात ते प्रतिषेधसूत्र होय. उदा."कलियुगी विद्यावन्तु नाही", "शेषशायी देवता होए परि परमेश्वरू नव्हे" या सूत्रात निषेधज्ञापक क्रियापदे आल्याने ती प्रतिषेध सूत्रे होत.

१०. **अधिकार सूत्रांचे लक्षण** :- जेव्हा प्रथम सूत्रातील अधिकृत पदाचा व्दितीय सूत्राशी अर्थाच्या दृष्टीने संबंध असतो, तेव्हा ते अधिकारसूत्र असते. उदा."नित्य व्यापक परमेश्वरू" हे प्रथम सूत्र आहे व अप्रमेयु हे व्दितीय सूत्र आहे. येथे प्रथम सूत्रातील "परमेश्वर" या अधिकृत पदाचा संबंध "अप्रमेयु" या व्दितीय सूत्राशी आहे. म्हणून "नित्य व्यापक परमेश्वरू" हे अधिकार सूत्र होय.

सूत्रप्रकृतिलक्षणाचे याप्रमाणे सविस्तर विवेचन करून या प्रकरणाच्या शेवटी भीष्माचार्यांनी श्री चक्रधरांच्या मार्गदर्शनाचा उल्लेख केला आहे. श्री चक्रधरस्वामींनी बारा प्रकरणसूत्रे व इतरही काही सूत्रे प्रकरणानुसार वेगवेगळी सांगितली आहेत. त्यामध्ये काही सूत्रांच्या शेवटी क्रियापदे, काहींच्या शेवटी विभक्तीपदे तर काहींच्या शेवटी अव्यये असतात. चक्रधरांनी सांगितलेल्या या त्रिविध सूत्रप्रकृती सूत्रांचे या ग्रंथात दहा प्रकार केले असून त्यांची सर्व सिध्दांतसूत्रे त्यात गोवली असल्याचे पं.भीष्माचार्यांनी सांगितले आहे.

सूत्रप्रकृतिनुसार केलेल्या या दहा प्रकारांपैकी विधिसूत्रे, प्रतिषेधसूत्रे व नियमसूत्रे या तीन प्रकारांतील सूत्रे क्रियापदयुक्त असतात. परिभाषा सूत्र, अपवादसूत्र आणि अधिकार सूत्र या तीन प्रकारांतील सूत्रांच्या शेवटी क्वचित क्रियापद असते तर काही वेळेला प्रथमा विभक्तीचे पद असते. अतिदेश सूत्राच्या शेवटी नेहमीच षष्ठी विभक्तीचे पद असते. विभाषा सूत्राच्या शेवटी क्वचित अव्यये, क्वचित संबोधनाचे एकवचनी पद आणि प्रथमा विभक्तीशिवाय इतर सर्व विभक्तींची पद्रे असतात. ज्या सूत्रात संबोधनी बहुवचन पद येते ते सूत्र गौरववाचक सूत्र समजावे.

सूत्रप्रकृतिनुसार केलेल्या सूत्रांच्या दहा प्रकारांची सोदाहरण व विस्तृत ओळख पं.भीष्माचार्यांनी पंचवार्तिकाच्या दुस-या प्रकरणात करून दिली आहे. या सूत्रभेदांचे लेखकांनी सांगितलेले हे सर्वसाधारण संकेत, त्या त्या सूत्रांचे ठळक विशेष म्हणता येतील.

सूत्रकारक लक्षण :-

पंचवार्तिकातील तिस-या प्रकरणात पं·भीष्माचार्यांनी सूत्रकारक लक्षण सांगितले आहे· "सूत्राचे आ अर्थाचे निर्णय कारकावाचौनि न होवेचि भणौनि सूत्रकारकाचे ज्ञान होआवेची लागे" असे कारकाचे महत्त्व सांगून शब्दारव्य, संप्रदायार्थारव्य आणि रहस्यारव्य अशा अर्थनिर्णयाच्या त्रिविध पध्दती त्यांनी सांगितल्या आहेत· कारक आणि विभक्ती, विभक्तींचे प्रत्यय आणि कारकार्थ तसेच प्रयोगांचाही विचार या प्रकरणात केला आहे· अर्थनिर्णयाच्या या त्रिविध पध्दतीनुसार आणि व्याकरणज्ञानाच्या आधारे श्री चक्रधरांनी सांगितलेल्या सिध्दांतसूत्रांचा अर्थनिर्णय केल्यास "वचनरूप परमेश्वर" दुखविला जाणार नाही, असे आश्वासन भीष्माचार्यांनी दिले आहे· कारकांच्या ज्ञानाअभावी कुणाचीही अवस्था "वाकम दिगमाच्या" गोष्टीप्रमाणे होईल याची जाणीवही लेखकांनी करून दिली आहे·

नामाचा क्रियापदाशी किंवा वाक्यातील इतर पदांशी असणारा संबंध म्हणजे "विभक्ती" होय· नामाचा क्रियापदाशी संबंध जोडणा-या विभक्तीला कारकविभक्ती व इतर पदांशी संबंध जोडणा-या विभक्तीला उपपद विभक्ती म्हणतात· कारक विभक्तीचा अर्थ तो कारकार्थ व उपपद विभक्तीच्या अर्थास उपपदार्थ म्हणतात· यावरून प्रथमा ते सप्तमी अशा सात विभक्ती सांगून त्यांचे अर्थही दिले आहेत·

१. **प्रथमा विभक्ती** :- प्रथमा विभक्तीचे कर्ता, कर्म व संबोधन असे तीन अर्थ असून या अर्थानुसार ती तीन प्रकारांनी होत असल्याचे दाखविले आहे· वाक्यात कर्ता असताना त्या कर्त्याची प्रथमा विभक्ती होते· उदा·"माया जीवाते विर्करे·" तसेच वाक्यातील कर्माचीही प्रथमा विभक्ती होते· उदा·"परमेश्वरे परमेशर पाविजे·" याशिवाय वाक्यात संबोध केलेला असेल तेव्हाही ही विभक्ती होते· उदा·"देमति, परमेश्वर कृपाळू असे परि जीवे कृपेसि पात्र होआवे की·" या तिन्ही उदाहरणात अनुक्रमे "माया", "परमेशर" आणि "देमति" या पदांची प्रथमा विभक्ती आहे·

२. **व्दितिया विभक्ती** :- व्दितियेचे कर्म, अत्यंत संयोग व प्रतिशब्द हे तीन अर्थ असून वाक्यात कर्म असताना त्या कर्माची व्दितिया विभक्ती होते· उदा·"मग जीव प्रपंचाते रचीति·" वाक्यात अत्यंत संयोगीही व्दितिया होते· उदा·"कृतयुगी लक्षभर आयुष्य·" याशिवाय वाक्यात प्रतिशब्द योग असेल तेव्हाही व्दितिया होते· उदा·"हे शास्त्र दृष्टांप्रति कारणु होए कां अदृष्टांप्रति कारणु होए·"

३. **तृतीया विभक्ती** :- या विभक्तीचे कर्ता, साधन आणि सहार्थक व विनार्थक शब्दयोग असे तीन अर्थ असून या अर्थानुसार तीन प्रकारांनी तृतीया विभक्ती होते. वाक्यात कर्ता असताना तृतीया होते. उदा. "तेने लाविले." वाक्य साधनात्मक असेल तेव्हाही ही विभक्ती होते. उदा. "आत्मज्ञाने मोक्ष". याशिवाय सहार्थक शब्दयोगी उदा."मा विश्वाचा पति तेनेंसि धरणे मांडिले असे" आणि विनार्थक शब्दयोगी उदा. "ज्ञाने विनु वैराग्य कांई करावे बापे आ." याप्रकारेही ही विभक्ती होते.

४. **चतुर्थी विभक्ती** :- चतुर्थीचे "संप्रदान" व "प्रयोजन" असे दोन अर्थ आहेत. उदा."ज्ञानियांसि मोक्ष देती", "परमेश्वरालागी रंका होआवे". यातील पहिले उदाहरण संप्रदानार्थ चतुर्थीचे असून दुसरे प्रयोजनार्थ चतुर्थीचे आहे.

५. **पंचमी विभक्ती** :- "अपादान" या एकमेव अर्थानुसार पंचमी विभक्ती होते. उदा."इश्वरापासौनि विद्या होए कां विद्यावंतापासौनि."

६. **षष्ठी विभक्ती** :- या विभक्तीचे "संबंध" आणि "शब्दयोग" असे दोन अर्थ असून "संबंध" अर्थी षष्ठी विभक्ती अशी होते. उदा. "कवाडांचा देऊळी न बैसावे". तसेच "माजी" आणि "मध्ये" हे दोन शब्दयोगी अव्यय आल्यासही षष्ठी होते. उदा. "तेआमाजी रीगे", "बहुतामध्ये जेआची विशेष प्रतीति."

७. **सप्तमी विभक्ती** :- सप्तमी विभक्ती "अधिकरण" या एकमेव अर्थानुसार होते. वाक्यात अधिकरण असताना ही विभक्ती होते. उदा. "इश्वरी संपूर्ण शक्ति जीवी अंशतः शक्ति."

विभक्तीचे सात प्रकार, त्यांचे अर्थ आणि वेगवेगळ्या अर्थानुसार त्या कशा होतात यांची माहिती देऊन पुढे या सातही विभक्तींच्या प्रत्ययांविषयी लेखकांनी विवेचन केले आहे. प्रथमा विभक्तीला प्रत्यय नाहीत. उदा.जीव, प्रपंच, परमेश्वरू, देवता. व्दितियेचे "ते", "सि", "आ" हे तीन प्रत्यय सांगितले आहेत. उदा. "मग जीव प्रपंचाते रचीति". क्वचित प्रत्यय नसतानाही व्दितिया होते. उदा. "परमेश्वर प्रवृति माया सृष्टि संहारू करी." तृतियेचे प्रत्यय "एं करोनि" व "नि" असे दोन आहेत. उदा."जीतेनि मृताचा धर्मी वर्तावे" क्वचित प्रत्ययलोपीही तृतीया होते. उदा. "परमेश्वर प्रवृत्ति माया सृष्टि संहारू करी." "सि", "कारणे", "लागी", "आ" हे प्रत्यय

चतुर्थीचे आहेत· उदा· "योग्यासि परमेश्वरु ज्ञानु देति·" क्वचित प्रत्ययलोपीही चतुर्थी होते· उदा· "महीळीये जन्मु दीहले·"

ज्या शब्दांच्या शेवटी "पासौनि", "पासभव", "स्तव", "तव", "कडौनि", "होनि" हे प्रत्यय येतात त्या शब्दांची पंचमी विभक्ती होते· उदा· "चन्द्रसूर्यापासौनि आनव·" "चा", "ची", "चे", "सि" हे प्रत्यय षष्ठीचे सांगितले आहेत· उदा· "इश्वरीचे ते सकळही नित्य·" क्वचित प्रत्ययलोपीही षष्ठी होते· उदा "प्रारब्धां भोगे क्षयो·" ज्या शब्दाच्या शेवटी "ई" हा प्रत्यय येतो, त्याची सप्तमी विभक्ती असते· उदा· "दयामाया कृपा करूणा हे इश्वरीचि आति" क्वचित प्रत्यय नसतानाही सप्तमी होते· उदा·"हाळि आं पाळि आं असावे" तसेच "साता" हा शब्द वाक्यात आला असतानाही ही विभक्ती होते· उदा· "ऐसा विखो बापुडा जो सेवित सातां आपुलिआ मोहरा न करी·"

साती विभक्ती, त्यांचे अर्थ व प्रत्यय यांचे कोष्टकरूपानेही पुढीलप्रमाणे एकत्रित विवरण देता येईल·

कोष्टक

अ·क्र·	विभक्तीचे नांव	विभक्तीचे अर्थ	विभक्तीचे प्रत्यय
१.	प्रथमा	कर्ता, कर्म व संबोधन	प्रत्यय नाहीत·
२.	व्दितिया	कर्म, अत्यंत संयोग व प्रतिशब्द	ते, सि, आ·
३.	तृतीया	कर्ता, साधन आणि सहार्थक व विनार्थक शब्दयोग	एं करौनि, नि
४.	चतुर्थी	संप्रदान व प्रयोजन	सि, कारणे, लागी, आ
५.	पंचमी	अपादान	पासौनि, पासभव, स्तव तव, कडौनि, होनि·
६.	षष्ठी	संबंध व शब्दयोग	चा, ची, चे, सि·
७.	सप्तमी	अधिकरण	ई

प्रथमा विभक्तीचे विवेचन करीत असताना पं·भीष्माचार्यांनी प्रयोगविचारही थोडक्यात केला आहे· पंचवार्तिकात दिलेल्या प्रयोगाच्या व्याख्यानुसार वाक्यात कर्ता असताना व कर्म नसताना कर्तरी प्रयोग होत असल्याचे सांगितले आहे· वाक्यात कर्ता नसताना व कर्म असताना कर्मणी प्रयोग होतो तर वाक्यात कर्ता अनुक्त व कर्माचा अभाव असताना भावे प्रयोग होतो· आजच्या मराठी व्याकरणातील तीन मुख्य प्रयोग पंचवार्तिकात सांगितले आहेत·

कारकाच्या ज्ञानाशिवाय सूत्राच्या अर्थाचा निर्णय करता येत नाही, असे कारक-विचाराचे महत्त्व सांगून शब्दाख्य, संप्रदायार्थाख्य आणि रहस्याख्य अशा अर्थनिर्णयाच्या त्रिविध पध्दती भीष्माचार्यांनी सांगितल्या आहेत· या आवश्यकतेतूनच पंचवार्तिकातील तिस-या प्रकरणात सात विभक्ती, त्यांचे प्रत्ययांसह अर्थ सोदाहरण सांगितले आहेत· सध्याच्या शास्त्रीय मराठी व्याकरणात प्रचलित असणा-या आठ विभक्तींपैकी "संबोधन" या आठव्या विभक्तीला मात्र भीष्माचार्यांनी स्वतंत्र स्थान दिलेले नाही· संबोधन विभक्तीचा अंतर्भाव त्यांनी प्रथमा विभक्तीतच केला आहे· विभक्तीचे प्रत्यय तत्कालीन भाषेमुळे आजच्यापेक्षा काही वेगळे असले तरी विभक्तीचे अर्थ मात्र प्रचलित विभक्तिविचारातील अर्थाशी मिळतेजुळते आहेत·

सूत्रव्याख्यान लक्षण :-

पं·भीष्माचार्यांनी या चौथ्या प्रकरणात वचनाच्या अर्थनिर्णयासाठी पदच्छेद, पदार्थोक्ति, विग्रह, वाक्ययोजना, आक्षेप व समाधान असे सूत्रव्याख्यानाचे सहा प्रकार सांगून या सहा प्रकारे सर्वज्ञांच्या वचनांचा अर्थनिर्णय करावा असे नमूद केले आहे· "जेथे पदच्छेद, पदार्थोक्ति, विग्रह, वाक्ययोजना, आक्षेप आणि समाधान या सहा प्रकारे सूत्राचा अर्थ प्रकाशित होतो, त्यास व्याख्यान म्हणावे·" अशी व्याख्या सांगून व्याख्यानाचे हे सहा प्रकार एका श्लोकातून सांगितले आहेत·

"पदच्छेदः पदार्थोक्तिर्विग्रहो वाक्ययोजना
आक्षेपश्च समाधानं व्याख्यानं षड्विधं मतम्·"

१. **पदच्छेद** :- व्याकरणदृष्टया प्रत्येक पदाचे त्या वाक्यातील स्थान म्हणजे पदच्छेद होय· "ज्या वाक्यात केवल, संयुक्त, अव्यय आणि क्रिया ही चार पदे येऊन विभक्तिचाही निर्देश केलेला असतो, ते पदच्छेदाचे वाक्य होय·" उदा· "मग जीव

प्रपंचाते रचीति·" या वाक्यात "मग" हे अव्ययपद, "जीव" हे प्रथमान्त केवलपद "प्रपंचाते" हे व्दितीयान्त संयुक्तपद आणि "रचीति" हे क्रियापद अशी चारही पदे आहेत, तसेच विभक्तिनिर्देश आहे·

२. **पदार्थोक्ति** :- वाक्यातील प्रत्येक पदाचे कार्य त्याच वाक्यात सांगितलेले असते, ते पदार्थोक्ति वाक्य होय· उदा· "माया कार्य जीवु जीवकार्य प्रपंचु·" "माया" आणि "जीव" या पदांचे कार्य आणि अर्थाची उक्ति याच वाक्यात सांगितली आहे·

३. **विग्रह** :- विग्रह करून ज्या शब्दांच्या अर्थाचा बोध होतो, असे शब्द ज्या वाक्यात येतात ते विग्रह वाक्य होय· उदा·कार्य, वासुदेव, जीवप्रपंचु, जिज्ञासा असे शब्द· "करण्यास योग्य ते कार्य", "वसुदेवाचा पुत्र तो वासुदेव", "जीव आणि प्रपंच तो जीवप्रपंच, "जाणावयाची इच्छा ती जिज्ञासा·"

४. **वाक्ययोजना** :- "वाक्ययोजनेचे" खंडान्वये व दंडान्वये असे दोन प्रकार सांगितले आहेत·

ज्या वाक्यात कर्ता, कर्म, क्रिया, विशेषण इतर करणादि उपपदे आणि आवश्यक त्या ठिकाणी अव्यये येतात असे वाक्य खंडान्वयी वाक्य होय· उदा· "ऐसिया मायापुराते स्वीकरोनि कर्मभूमिस्थितां मनुष्यदेहयुक्तां जीवांज्ञानपर्यंत आपुला संबंधु देति" या वाक्यात वरील सर्व पदे आहेत·

ज्या वाक्यात प्रथम विशेषणयुक्त कर्ता, मग विशेषणयुक्त करणादि उपपदे नंतर विशेषणयुक्त कर्म व विशेषणयुक्त क्रियापद तसेच आवश्यक त्या ठिकाणी अव्यय येते, असे वाक्य दंडान्वयी वाक्य होय· उदा·"एथिचे आसि प्राणपदीची पीडा नाही" हे वाक्य वरील लक्षणांनी युक्त आहे·

५. **आक्षेप** :- सूत्रात एखाद्या पदाचे आक्षेप घेण्यायोगे प्रयोजन असल्यास ते आक्षेप वाक्य होय· उदा· "यापरि परमेश्वरू श्री चक्रधर सकळ जीवांते उध्दरीती·" या वाक्यात "परमेश्वरू" हे पद एकदा आले असताना पुन्हा "श्रीचक्रधर" हे पद योजिण्याची गरज काय ? हा आक्षेप आहे·

६. **समाधान** :- सूत्रात एखाद्या पदाचे प्रयोजन दाखविले असेल तर ते सूत्र समाधान वाक्य म्हणावे· समाधान वाक्याची व आक्षेप वाक्याची लक्षणे परस्परविरोधी

वाटतात. उदा. "यापरि परमेश्वरू श्री चक्रधर सकळ जीवांते उध्दरिती." या सूत्रात "श्री चक्रधर" या पदाने व्यक्तिनाम सुचविले आहे. हे पद जर नसेल तर केवळ "परमेश्वर" हे पद अव्यक्त म्हणजे व्यक्तिनामविरहित राहते. आणि "परमेश्वर" अव्यक्त असेल तर उध्दरण कसे होणार ?, म्हणून "चक्रधर" या पदाची आवश्यकता भासते. या पदाचे वाक्यात प्रयोजन आहे. तसेच श्री चक्रधर सकळ जीवांचे उध्दरण करतात. येथे असे उध्दरण करू शकणारा चक्रधर कोण ?, तर परमेश्वर. असे "परमेश्वर" या पदाचेही प्रयोजन आहे. "श्रीचक्रधर" व "परमेश्वर" दोन्ही पदांचे प्रयोजन दाखविल्यामुळे समाधान होते. म्हणून हे समाधान वाक्य होय.

सूत्रव्याख्यान वरील क्रमानेच करावे असे सांगून एकाच सूत्राचे सूत्रव्याख्यान वरील सहाही प्रकारे कसे करता येते हे लेखकांनी दाखविले आहे. उदा. "परमेश्वर प्रवृत्ति माया व्यापारवशे अविद्यात्मक जीव "चैतन्यमहं" ऐसे घेऔनि उठीति." या सूत्राचा पदच्छेद याप्रमाणे होईल -

"परमेश्वर प्रवृत्ति", "माया व्यापारवशे" ही तृतीयान्त संयुक्तपदे.

"अविद्यात्मक" हे विशेषणात्मक संयुक्तपद.

"जीव", "चैतन्य" व "महं" ही प्रथमान्त केवलपदे.

"ऐसे" व "घेऔनि" ही अव्ययपदे आणि

"उठीति" हे क्रियापद.

........या सूत्रातील विग्रह पुढीलप्रमाणे करता येतो.

परमेश्वराची प्रवृत्ति ती परमेश्वरप्रवृत्ति

मायेच्या व्यापाराच्या वशे ते मायाव्यापारवशे,

अविद्या असे आत्मा ज्याचा ते अविद्यात्मक.

.........वरील उदाहरणाची वाक्ययोजना पुढील दोन प्रकारे -

खंडान्वयी :- "जीव उठीति" कशासाठी ? तर "चैतन्यमहं."

"ऐसे घेऔनि" कसल्या प्रकारचे जीव ? तर "अविद्यात्मक."

"कणवाचे आवशे" ? तर "मायाव्यापारवशे."

"माया व्यापारासि का प्रवर्तली ?" तर "परमेश्वर प्रवृत्तीने."

दंडान्वयी :- "अविद्यात्मक जीव परमेश्वर प्रवृत्तिमाया व्यापारवशे"

"चैतन्यमहं" ऐसे घेऔनि उठीति."

........या सूत्रातील <u>पदार्थोक्ति</u> याप्रमाणे -

अविद्यात्मक जीवाचे कार्य परमेश्वर प्रवृत्तीशी अधीन होणे.

परमेश्वराचे कार्य अविद्यात्मक जीवांसाठीच.

........या सूत्रातील <u>आक्षेप</u> असा आहे -

या सूत्रात "अविद्यात्मक" या पदाचे प्रयोजन काय ? हा आक्षेप आहे. हे पद नसते तरी "माया व्यापारवशे जीव" असे म्हणता आले असते.

........या सूत्रात <u>समाधान</u> पुढीलप्रमाणे होते -

"अविद्यात्मक" या पदाचे प्रयोजन काय ? तर मुक्तीच्या जीवाच्या ठिकाणी विद्या असते, अविद्या नसते म्हणून. अविद्यात्मक जीवांसाठीच परमेश्वराचे कार्य आहे. याचे या पदामुळे स्पष्टीकरण होऊन हे पद आवश्यक असल्याचे समाधान होते.

एकाच सूत्राचे या सहा प्रकारे व्याख्यान करून सूत्राचा वेगवेगळा अर्थ कसा प्रकाशित होतो हे सोदाहरण भीष्माचार्यांनी दाखविले आहे.

<u>सूत्रस्वरूपलक्षण</u> :-

पंचवार्तिकाच्या या पाचव्या व शेवटच्या वार्तिकात पं.आनेराजबासांनी प्रतिपादन केलेली "लक्षणरत्नाकरा"तील अर्थनिर्णयाची बत्तीस लक्षणे सांगितली आहेत.[७] श्री चक्रधरांनी सांगितलेल्या सूत्रांतील भाव स्पष्ट होऊन त्यांचा अर्थ उत्कृष्टपणे कसा कळतो याचे सोदाहरण विवरण या प्रकरणात पं.भीष्माचार्यांनी केले आहे. या पाचव्या वार्तिकाबद्दल डॉ.उषा देशमुख म्हणतात, "पहिल्या चार प्रकरणांत पंचवार्तिकाचा पूर्वार्ध संपतो. शेवटच्या पाचव्या वार्तिकात उत्तरार्ध सुरू होऊन त्यात वाक्यांतील परस्परसंबंध व अन्वय स्पष्ट झाल्याने वाक्यार्थ कळू लागून पाचव्या वार्तिकात प्रतिज्ञा, प्रमाण, दृष्टांत, उपपत्ती इ. बत्तीस लक्षणांच्या साहयाने सूत्रांचे अंतरंग व बाहयांग सूक्ष्मपणे स्पष्ट करून सांगितले आहेत.[८]

सूत्रांचे विविध अर्थ होतात. तसेच सूत्रात विविध प्रकारचे भाव असतात. हे विविध भाव एकंदर बत्तीस लक्षणांनी वेगवेगळ्या प्रकारे प्रकट होतात. "ज्या बत्तीस लक्षणांनी त्या त्या लक्षणवैशिष्टयांनुसार सूत्रांचे भाव प्रकाशित होतात, त्याला सूत्रस्वरूप म्हणावे" अशी सूत्रस्वरूपाची व्याख्या सांगून लेखकांनी एकूण ३२ सूत्रे क्रमवार सांगितली आहेत. यापैकी पहिली सोळा लक्षणे प्रबोधात्मक असून नंतरची सोळा संबंधात्मक आहेत.

ही बत्तीस लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत -

प्रतिज्ञा, प्रमाण, दृष्टांत, उपपत्ति, व्यावृति, विषयप्रदान, विशेषप्रबोध, उत्सर्ग, अपवाद, निषेध, न्याय, विरोधपरिहार, काकु, कक्षा, भावार्थ, प्रकरण, अस्तित्व, निर्देश, निर्णयो, पक्ष, प्रभेद, आशंका, आक्षेप, कार्य, लक्षण, स्वरूप, कारण, हेतु, संबंध, प्रतीति, विशेषण, प्रतिष्ठा·

या बत्तीस लक्षणांची अर्थासह लक्षणे आणि प्रत्येकाची उदाहरणे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत·

१. <u>प्रतिज्ञा</u> :- फलश्रुतिज्ञापक म्हणजेच फलश्रुती सांगणारे वाक्य म्हणजे प्रतिज्ञासूत्र होय· उदा· "विकार विकल्प शून्य····जो जन्म क्षेपी तेआसि परमेश्वर पुनरपि आपुला संबंध देती·" विकार विकल्पशून्य असा आचार अनुसरून जन्म घालविल्यास ईश्वर त्यांना आपले दर्शन देतात ही फलश्रुती या वाक्यात आहे·

२. <u>प्रमाण</u> :- ज्यामुळे दृष्ट आणि अदृष्ट अर्थाचे अनुभवज्ञान होते, ते प्रमाणसूत्र होय· उदा· "विकार हा इंद्रियधर्म विकल्प हा मनोधर्म·" या वाक्यात "विकार" हा दृष्टा-इंद्रियगोचर असल्याने दिसणारा अनुभव आहे तर विकल्प हा मनोधर्म असल्याने तो अदृष्ट-न दिसणारा आहे·

३. <u>दृष्टांत</u> :- ज्या सूत्रात दृष्ट उदाहरणातून अदृष्ट अर्थ दाखविलेला असतो, ते दृष्टांतसूत्र होय· दृष्टांतसूत्रात अदृष्ट असणारा अर्थ दृष्ट केला जातो· उदा· ग्रेथे हत्तीचा दृष्टांत दिलेला आहे· प्रत्येकाला आपापल्या दृष्टीनुसार हत्तीचा एकेक अवयव दिसतो, पण तो संपूर्ण हत्ती नव्हे· या सर्व अवयवांनो मिळून सर्व शक्तिमान हत्ती होतो· असाच परमेश्वर असतो· "परमेश्वर" या अदृष्ट शक्तीचा अर्थ या दृष्ट उदाहरणाने उलगडून दाखविला आहे· म्हणून हे दृष्टांतसूत्र होय·

४. <u>उपपत्ति</u> :- योग्यायोग्य क्रियेचे फल ज्या सूत्रात सिध्दांतरूपाने सांगितलेले असते ते उपपत्तिसूत्र होय· उदा· "पापाय फल दुखः· पुण्याय फल सुख·" या सूत्रात पाप आणि पुण्य अशा दोन्ही क्रियेचे फल सांगितले आहे·

५. <u>व्यावृत्ति</u> :- एखाद्या सामान्य पदार्थाचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी विशेष पदाचा तिरस्कार ज्या सूत्रात केलेला असतो, असे सूत्र व्यावृत्तिसूत्र होय· उदा· "चैतन्य देवता होए परि परमेश्वरू नव्हे·" या सूत्रात "चैतन्य" या पदाचे यथार्थज्ञान करून देणारा "परमेश्वर" या पदाचा तिरस्कार केलेला आहे·

६. <u>विषयप्रदान</u> :- पदार्थाचे निर्वचन-वर्णन स्पष्टीकरण परमेश्वर शास्त्रानुसार करून एखादे सार ज्या सूत्रात सांगितलेले असते ते विषयप्रदान सूत्र होय. उदा."एकाते प्रपंच परिणामु बोलिजे, एकातें विवर्तु बोलिजे, एथ तैसे नोहे: प्रपंच भणजे स्वतंत्र पदार्थु एकु आति." या सूत्रात "प्रपंच" हा स्वतंत्र पदार्थ आहे, हे सार सांगितले आहे.

७. <u>विशेषप्रबोधक</u> :- आचार करताना करणे प्राप्त झालेल्या योग्यायोग्य कर्मविधिंपैकी कोणते कर्म करावे व कोणते करू नये याचा विशेषबोध ज्या सूत्राव्दारे होतो ते विशेषप्रबोधक सूत्र होय. उदा."अल्प अनिष्टे बहुते अनिष्टे परिहारिजेति तरि परिहारिजे." मोठे अनिष्ट टाळण्यासाठी लहान अनिष्ट करावे लागले तरी करावे. हा बोध सांगण्यासाठी लेखकांनी आजारी माणसाचे उदाहरण दिले आहे. आजार बरा होण्यासाठी वनस्पतींची पाने तोडणे आवश्यक आहे. म्हणजेच आजाराचे मोठे अनिष्ट टाळण्यासाठी वनस्पतींची पाने तोडून अशी हिंसा करावी लागली तरी हरकत नाही. असा बोध या सूत्रातून होतो.

८. <u>उत्सर्ग</u> :- ज्या सूत्राने अर्थमात्राचे उच्छेदन केले जाते ते उत्सर्गसूत्र होय. उदा."धर्म नष्टु आति परि विषय नष्टु नाति" धर्म नष्ट करू पाहिला तरी विषय नष्ट होऊ शकत नाही. या सूत्राने "एथ अनुसरे तेतुका वांचे" जो अनुसरील तो भोगील या सूत्राच्या अर्थाचे उच्छेदन केले आहे.

९. <u>अपवाद</u> :- उत्सर्गाची निंदा करून निषेध करणे म्हणजे अपवाद, असा अपवाद ज्या सूत्रात केला जातो ते अपवादसूत्र होय. उदा. "अनंते उध्दरिले" हे अपवादसूत्र "धर्म नष्टु आति परि विषय नष्टु नाति" या सूत्राचा निषेध करते.

१०. <u>निषेध</u> :- कुठेही स्वीकारार्ह न होणारा तिरस्करणीय असणारा अर्थ ज्या सूत्राचा असतो ते निषेधसूत्र होय. उदा."विखार विखो न सेवावा" या सूत्राचा अर्थ तिरस्करणीय आहे.

११. <u>न्याय</u> :- ज्या सूत्रातून दुस-या अनुक्त-सुप्त अर्थाची सिध्दता होते ते न्यायसूत्र होय. उदा."एथियें आसि प्राणापदीची पीडा नाही." या सूत्रातून "अंतीचे दुःख सकळ फळी आति" या अनुक्त अर्थाची सिध्दता होते.

१२. <u>विरोधपरिहार</u> :- एखादे वेळी "कर्म करणे" आवश्यक वाटूनही ते करता येत नाही उलट "करू नये" ते करावे लागते, अशा परिहाराने व्याप्त सूत्र ते विरोध-परिहार सूत्र होय. उदा. "सेवकासि अविधि नाही." सेवा करताना श्रींच्या मूर्तीला हात-पाय लागतात. नखे काढताना, क्षौर करताना श्रींना वेदना होऊन सेवकांकडून त्यांची अवज्ञा घडल्यासारखे होते. परंतु सेवेचा अंगिकार केलेला असल्याने हे करणे क्रमप्राप्तच असते.

१३. <u>काकु</u> :- शब्दाच्या उत्कर्षाने मुख्यार्थाचा त्याग करून जी अन्य उक्ती करावी लागते, असे सूत्र काकुसूत्र होय. उदा. "ऐसा विखो। बापुडा जो सेवित सातां आपुलिआ मोहरा न करी" येथे "मोहरा करी" या शब्दाचा उत्कर्ष साधून "मोहरा न करी" हा मुख्यार्थ जातो.

१४. <u>कक्षा</u> :- एखाद्या विशिष्ट पदार्थाविषयीचा गूढ अर्थ एका विशिष्ट शब्दाने ज्या सूत्रात उल्लेखिला जातो, ते कक्षासूत्र होय. उदा. सामान्य स्त्रीयांना पाहून "स्त्रिया आल्या" असे म्हणण्याऐवजी "माणसे आली" असे म्हटल्यास या सूत्रातून माणसे म्हणजे "अतिनीच बाईया" म्हणजे खालच्या दर्जाच्या स्त्रियांचा उल्लेख करावयाचा असतो.

१५. <u>भावार्थ</u> :- शब्द जसा योजिलेला असेल तसाच त्याचा अर्थ सूत्रात मानला जात असेल तर ते भावार्थ सूत्र होय. उदा. "चातुर्वर्ण्ये चरेम्दैक्ष्यम" या सूत्रातील शब्दांचा आहे तसाच अर्थ मानला जातो.

१६. <u>प्रकरण</u> :- एखाद्या अनेकार्थी शब्दाचा प्रसंगानुरूप एकच अर्थ मानला जातो, असे सूत्र प्रकरणसूत्र होय. उदा. अस्तिपर (अस्तिकवादी) सर्व प्रकरणांना "देवता प्रकरणे" असे संबोधिल्यास या सूत्रातील "देवता" हा अनेकार्थी शब्द "परमेश्वर" या एकाच अर्थाने समजला जातो.

१७. <u>अस्तित्व</u> :- ज्या सूत्रात "आति" इ. सारख्या अस्तित्व दर्शविणाऱ्या होकारार्थी क्रियापदांनी वस्तूचा उल्लेख केला जातो, ते अस्तित्वसूत्र होय. उदा. "सच्चिदानंद स्वरूप परमेश्वरू एकु आति" या सूत्रात परमेश्वराचे अस्तित्व निर्धारिले आहे.

१८. <u>निर्देश</u> :- एखाद्या पदार्थाचे जसे स्थानभेद असतील तसेच त्यांचे निर्वचन म्हणजेच निर्देश ज्या सूत्रातून केलेले असतील ते निर्देशसूत्र म्हणावे. उदा. "देवता एकी

उचा एकी नीचा पैल आठ तीनि समानचि·" देवता काही उच्च तर काही खालच्या दर्जाच्या, असे देवतांचे यथार्थ भेद या सूत्रात सांगितले आहेत·

१९. <u>निर्णयो</u> :- एखाद्या सूत्रात एकाच शब्दाचे अनेक अर्थ जाणवतात ते निर्णयसूत्र होय· उदा·"चैतन्या पर परमेश्वरू" या सूत्रात "हीना"चाही उच्च असणा-याबरोबर किंवा "हीना"बरोबर उच्च असणा-याचा उल्लेख जाणवतो·

२०. <u>पक्ष</u> :- ज्या सूत्रातील एका शब्दाचे अनेकार्थ होतात ते पक्षसूत्र होय· उदा·"आत्मज्ञाने मोक्ष" या सूत्रात "आत्म" आणि "मोक्ष" या शब्दांचे अनेक अर्थ होतात·

२१. <u>प्रभेद</u> :-ज्या सूत्रात परस्परांपासून वेगळ्या विजातीय वस्तूंचे स्पष्टीकरण केलेले असते ते प्रभेद सूत्र होय· उदा·"जीवजीवा साजात्यं हे सर्क्क वैजात्य·"

२२. <u>आशंका</u> :- एखाद्या सूत्रात विरोधकल्पनेचा उदय झालेला असतो, ते आशंकासूत्र होय· उदा·"दर्शनी अदर्शन·" या सूत्रात विरोधकल्पना निर्माण होते·

२३. <u>आक्षेप</u> :- ज्या सूत्रात आक्षेप केलेला असतो ते आक्षेपसूत्र होय· उदा·"अन्यत्र कीजे ते वाराणसी फेंडिजे· वाराणसी कीजे ते के फेडावे नायका ?" इतरत्र केलेल्या कृत्यांचे परिमार्जन वाराणसीला करता येईल पण वाराणसीला केलेले कुठे फेडावे ? हा आक्षेप या सूत्रात आहे·

२४. <u>कार्य</u> :- ज्या सूत्रात कार्याचे निरूपण-कथन असते, ते कार्यसूत्र होय· उदा·"जीव अर्जक देवता फलदाती चैतन्य त्यापारते परमेश्वरू उध्दरिता·" या सूत्रात कार्याचे निरूपण आहे·

२५. <u>लक्षण</u> :- नित्य आणि अनित्य पदार्थांचे असाधारणत्व ज्या सूत्रात वर्णन केलेले असते ते लक्षणसूत्र होय· उदा·"नित्यबध्दा देवता", "बध्दमुक्त जीव", "नित्यमुक्त परमेश्वरू", "प्रपंच अनित्य" या सूत्रांत नित्यानित्य पदार्थांचे असाधारणत्व वर्णन केले आहे·

२६. <u>स्वरूप</u> :- ज्ञान विज्ञानवंत स्वरूपाचे वर्णन ज्या सूत्रात केलेले असेल ते स्वरूपसूत्र होय· उदा·"देवता स्वरूपे ज्ञाप्ते आनंदरूपे", "आनंदे दुमदुमित असे", "ब्रह्म ते निःशब्द·"

२७. **कारण** :- ज्या सूत्रात कारणाचे निरूपण-कथन केलेले असते ते कारणसूत्र होय· उदा·"परमेश्वरापासौनि अनंतावसारं·"

२८. **हेतु** :- ज्या फलवाक्यात फलाच्या आवश्यकतेनुसार विधिनियम कल्पना केलेली असते ते हेतुसूत्र होय· विधिकल्पना दोन प्रकारच्या -

(अ) विधिकल्पना :- उदा·"तळमळीत जन्माते धाडी ते आसि परमेश्वरू आपुले प्रेम देति·" इश्वराच्याच तळमळीतून जन्म मिळालेला असेल तर त्याला परमेश्वर स्वतः प्रेम देतात·

(ब) **निषेधकल्पना** :- उदा·"विखो अनंता तापां आश्रयां नरकासि हेतु·" विषयाच्या पूर्णपणे आहारी गेल्यास नरकाच्या आश्रयास जावे लागते म्हणून विषयाच्या आहारी जाऊ नये ही निषेधकल्पना या सूत्रात आहे·

वरील दोन्ही सूत्रात कर्मानुसार त्याचे फल सांगताना विधि व निषेध कल्पना मांडून हेतू स्पष्ट केला आहे· म्हणून हे हेतुसूत्र होय·

२९. **संबंध** :- मागील सूत्राचा संबंध जेव्हा उपसंहारात्मक वाक्यात सांगितलेला असतो तेव्हा ते संबंधसूत्र असते· उदा·"यापरि मनुष्यपर्यंत मोळे", "ऐसा परमेश्वरू एकु आति·" या दोन्ही सूत्रात अनुक्रमे "यापरि" व "ऐसा" या दोन शब्दांनी मागील सूत्रांचा संबंध-संदर्भ सांगितलेला आहे·

३०. **प्रतीति** :- "होते ते होतेच व नाही ते नाहीच" असा ज्या सूत्राने यथार्थ निश्चय प्रकट होतो ते प्रतीतिसूत्र होय· उदा·"कर्ममिचिआ देवता होति परि परमेश्वर न होति·" कर्मानुसार देवतारूप होता येईल पण परमेश्वर होता येणार नाही· या सूत्रात यथार्थ निश्चयाची प्रतीति आणून दिली आहे·

३१. **विशेषण** :- ज्या सूत्रातील विशेषणामुळे दुस-या एखाद्या सूत्रात स्थित असलेल्या विशेष्यास व्यापले जाते ते विशेषणसूत्र होय· उदा·"आनंद तो" यासारख्या विशेषणसूत्राने "ऐसा परमेश्वर एकु आति" या सूत्रातील "परमेश्वर" या विशेष्याला व्यापले आहे· "परमेश्वर" या नामाविषयी विशेष माहिती सांगितली आहे·

३२. **प्रतिष्ठा** :-ज्या सूत्राने शास्त्राचा उत्कर्ष करून त्याची प्रतिष्ठा वाढविली जाते. ते प्रतिष्ठासूत्र होय· उदा·"हे अधृत शास्त्र की गा" या सूत्रात शास्त्राचा उत्कर्ष प्रतिष्ठिला आहे·

श्री चक्रधरोक्त सूत्रपाठातील सूत्रांच्या भाषेची पध्दती वाचकांना समजावी· सूत्रांचा अर्थ अधिक स्पष्ट व्हावा या उद्देशांनी पं·भीष्माचार्यांनी पंचवार्तिकाची उभारणी केली· पंचवार्तिकाचे निरूपण प्रामुख्याने व्याख्यास्वरूपी आहे· या ग्रंथातील पाच वार्तिकात व्याकरणातील ब-याच संकल्पना लेखकांनी स्पष्ट केल्या आहेत· सूत्र, वचन, वाक्य, महावाक्य, संधी, समास, लिंग, प्रयोग, क्रियापद, कृदन्ते व तध्दिते यांचा सोदाहरण ऊहापोह पहिल्या "सूत्रलक्षण" या वार्तिकात केला आहे· सूत्रांची "दशधा" प्रकृती कशी आहे याचे विवेचन उदाहरणांसह दुस-या वार्तिकात करून तिस-या वार्तिकात कारकांची माहिती सांगितली आहे· याच तिस-या प्रकरणात विभक्तिंची संख्या, प्रत्यय व त्यांचे अर्थ सोदाहरण स्पष्ट केले आहेत· एकूण सहा प्रकारांनी सूत्रांचे व्याख्यान कसे केले जाते याची विवेचनात्मक मांडणी चौथ्या वार्तिकात करून पाचव्या वार्तिकात बत्तीस लक्षणांच्या साहयाने सूत्रांचे अंतरंग व बहिरंग स्पष्ट करून सांगितले आहे· पंचवार्तिकातील पाच वार्तिकांचा परस्परांशी संबंध-"अन्वय" कसा आहे हे दाखवून पंचवार्तिकावर विस्तृत भाष्य दुस-या एका अन्वयकार भीष्माचार्यांने केल्याची नोंदही आढळते·[९] आपली भूमिका स्पष्ट करताना अन्वयकारांनीही "हे पंचवार्तिक अभ्यासिजे तरि सकळही परमेश्वर शास्त्र प्रकाशे" असे अभिवचन दिले आहे·

"पंचवार्तिक" हा ग्रंथ व्याकरणग्रंथ असल्याचे त्याच्या स्वरूपावरून स्पष्ट होते· विवेचनाच्या दृष्टीने या ग्रंथातील माहिती त्रोटक वाटली तरी मराठी व्याकरणातील काही संकल्पनांचा ऊहापोह या ग्रंथात केला आहे· या संदर्भात व·दा·कुलकर्णी म्हणतात- "पंचवार्तिक हा ग्रंथ व्याकरणशास्त्राचा नसून तो अर्थनिर्णयशास्त्राचा आहे· तो भाषाशास्त्राचाही ग्रंथ नाही· श्रीचक्रधरोक्त सूत्रांचा अर्थनिर्णय व्याकरणाच्या आधारे कसा करता येतो हे त्यातून स्पष्ट होते· अर्थात व्याकरणतत्वांच्या आधारे श्रीचक्रधरोक्त सूत्रांचे विवेचन करणारा मराठी भाषेतील व्याकरणविषयक चर्चा करणारा पहिला ग्रंथ पंचवार्तिक होय·"[१०] यावरून हे स्पष्ट होते की, सूत्रांचा अर्थनिर्णय करण्याच्या उद्देशाने का होईना व्याकरणाची चर्चा पंचवार्तिकात केली आहे· म्हणून या ग्रंथाला मराठी भाषेतील "आद्य व्याकरण ग्रंथ" म्हणणे उचित ठरेल·

:::: संदर्भ ::::

१. व·दा·कुलकर्णी, "पंचवार्तिक", **महानुभाव**, महन्त श्री नागराजबाबा महानुभाव (संपा·), व· ४३वे, अं· १व २, औरंगाबाद, (एप्रिल-मे १९९१), पृ·५.

२. मो·के·दामले, **शास्त्रीय मराठी व्याकरण**, (संपा·) कृ·श्री·अर्जुनवाडकर, प्र·आ·वरून मुद्रित, देशमुख, पुणे, १९७० , पृ·४८५.

३. तत्रैव, पृ·४८५.

४. तत्रैव, पृ·८९.

५. तत्रैव, पृ·६०८.

६. उषा मा· देशमुख, **साहित्यमुद्रा**, प्र·आ·, लोकवाङ्मय, मुंबई, १९९०, पृ· ३१.

७. व·दा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· १४ । १५.

८. उषा मा· देशमुख, उ·नि·, पृ· ४५ । ४६.

९. व·दा·कुलकर्णी, उ·नि·, पृ· १५.

१०. तत्रैव, पृ· २१.